ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 26 ]
Total No. of Questions : 26 ]

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4
[ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 102-M (NS)**
**Code No. : 102-M (NS)**

# ಶಿಕ್ಷಣ
# EDUCATION
# ಮೂಲ ಪರಿಕಲ್ಪನೆಗಳ ಪರಿಚಯ
# INTRODUCTION TO BASIC CONCEPTS

(ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ)
( Marathi Version )

**(ಹೊಸ ಪಠ್ಯವಸ್ತು)**
**( New Syllabus )**

ದಿನಾಂಕ : 06. 06. 2017 ]
Date : 06. 06. 2017 ]

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 10.00 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1.00 ರವರೆಗೆ ]
Time : 10.00 A.M. to 1.00 P.M. ]

[ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 60
[ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*
*Register Number of the Candidate*

**भाग - I**

खालील प्रत्येक प्रश्नाला **चार** पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी अति योग्य पर्याय निवडा आणि उत्तर उत्तर-पत्रिकेमध्ये लिहा. **सर्व** प्रश्न सक्तीचे आहेत : 10 × 1 = 10

1. अध्यापनशास्त्राचा अर्थ
   (A) पाठाच्या अध्यापनासाठी आवश्यक असलेले सखोल ज्ञान
   (B) प्रौढांच्या अध्यापनाची कला आणि विज्ञान
   (C) बालकांच्या अध्यापनाची कला आणि विज्ञान
   (D) अध्यापनाची पद्धत आणि तंत्र.

2. शिक्षणाच्या हेतूवर राष्ट्रीय केंद्रिकृत गटाने स्थान पत्रिकेमध्ये केलेल्या शिफारशी आहेत. शालेय जीवन
   (A) बालकाच्या कुटुंबाच्या अनुभवाशी संबंध निर्माण करणे
   (B) समुदायाच्या अनुभवाशी संबंध निर्माण करणे
   (C) बालक आणि समुदायाच्या अनुभवाना अडथळा करणे ( थोपविणे )
   (D) बालकाच्या घरातील आणि समुदायातील अनुभवाचे संबंध जोडणे.

3. सकारात्मक ओळख ही खालीलपैकी या मनो-सामाजिक घटकाने बनलेली आहे.

(A) स्व-संकल्पना (B) स्व-प्रतिष्ठा

(C) स्व-विश्वास (D) वरील सर्व.

4. व्यक्तीच्या जीवनात कोणत्या पायरीला ''प्रौढावस्थेचा उंबरठा'' असे म्हणतात ?

(A) शिश अवस्था (B) बाल्यावस्था

(C) किशोरावस्था (D) वृद्धावस्था.

5. कशल नावांच्या विद्यार्थ्याने अध्ययन कृती, प्रयोग, नमुने आणि इतर साहित्य वापरुन अध्ययनात अधिक प्रगती संपादन केली आहे. म्हणून तो ............ प्रकारचा अध्ययनकर्ता आहे.

(A) दृश्यीय (B) स्पर्श ज्ञान कर्ता ( Kinesthetic )

(C) श्राव्यीक (D) लिहणारा आणि वाचणारा.

6. NCF 2005 नुसार शाळेतील विविधतेत आणि समावेश शिक्षणामध्ये अभ्यासक्रम विकास आणि सुधारणेत हे असावेच

(A) प्रतिभावत बालकासाठी विशेष शिक्षण पुरवावे

(B) ग्रामीण बालकांना उत्तम शिक्षण पुरविणे

(C) पाठ्यपुस्तक संस्कृतीपासून दूर जाण्याच्या परिश्रमासाठी सर्व बालकाना अर्थपूर्ण अनुभव पुरविण्यासाठी

(D) अध्ययनात मागे राहिलेल्या बालकांसाठी विशेष वर्ग घेणे.

7. प्राथमिक शाळेतील कार्यक्रमात 'पढे भारत बढे भारत' चा मुख्य उद्देश हा आहे.

(A) इयत्ता I ते 3 री पर्यंतच्या सर्व बालकांच्या स्वतःच्या मातृभाषेत वाचन कौशल्यात स्पष्टता विकसित करणे.

(B) इयत्ता I ते 3 री पर्यंतच्या सर्व बालकात स्वतःच्या मातृभाषेतोल चुकारहीत लिखाण कौशल्य विकसित करणे.

(C) इयत्ता I ते 3 री पर्यंतच्या सर्व बालकामध्ये गणितामधील साधा हिशेब, मूलभूत संकल्पना बळकट करणे

(D) वरील सर्व.

8. 'सर्व शिक्षण अभियान' याची आमलबजावणी यावर्षी करण्यात आली.

(A) 2000 - 2001 (B) 2001 - 2002

(C) 2010 - 2011 (D) 2014 - 2015.

9. RTE - 2009 नुसार खाजगी शाळेत बालकांची नांवे नोंदविलेल्या आरक्षणाची टक्केवारी ही आहे.

(A) 10% (B) 25%

(C) 30% (D) 50%

10. घटनेच्या 350 (A) या कायद्यात सूचविलेले मुद्दे हे आहेत.

(A) प्राथमिक स्थरातील शिक्षणामध्ये भाषीक अल्पसंख्यांक गटाना मातृभाषेत सूचना पुरविण्याची सोय करणे.

(B) राज्या बाहेरील फंड व्यवस्थेत कोणत्याही शक्षणिक संस्थाना धार्मिक सूचना पुरवू नयेत.

(C) 14 वर्षे पूर्ण होईपर्यंत सर्व बालकाना मुफ्त आणि सक्तीचे शिक्षण देणे.

(D) भारतामध्ये सार्वभौमत्व, ऐक्य आणि एकता याना समर्थन आणि सुरक्षा देणे.

## भाग - II

खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. प्रत्येक प्रश्नांचे उत्तर **अर्ध्या** पानापेक्षा जास्त असू नये : $5 \times 2 = 10$

11. "शिक्षणाचे सामाजीकरण शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या भूमिका ओळखण्यास मदत करतात."

    हे तुम्ही तुमच्या वर्गखोलीतील अनुभवाला लागू करा आणि लिहा.

12. "जवळीक विकास स्थर" ( zone of proximal development ) याचे उदाहरणासह थोडक्यात वर्णन करा.

13. अध्ययनाच्या काणत्याही चार गुण वैशिष्ट्यांची यादी करा.

14. विद्यार्थी-शिक्षक म्हणून समावेशात्मक मधील अडथळे ( प्रतिबंध ) दूर करण्याकरिता तुम्ही सूचविलेल्या कोणत्याही चार पद्धती विषयी लिहा.

15. DPEP ( जिल्हा स्थरीय प्राथमिक शिक्षण कार्यक्रम ) चे कोणत्याही दोन मुख्य उद्दिष्टांचे थोडक्यात वर्णन करा.

16. प्राथमिक शिक्षण सार्वत्रीकरणाच्या कोणत्याही दोन मुख्य ध्येयांची यादी करा.

17. शाळा शिक्षण पद्धतीमधील पारंपरिक पद्धत आणि समावेशक पद्धत यामधील चार फरक स्पष्ट करा.

18. वर्गामध्ये वेगवेगळ्या अध्ययन वेगाच्या विद्यार्थ्यांची व्यवस्था करण्यासाठी तुम्ही सुचविलेले उपाय कोणते ?

## भाग - III

खालील प्रत्येक प्रश्नांला एक पर्याय प्रश्न दिलेला आहे. त्यापैकी एकही लिहिणे आवश्यक आहे. प्रत्येकाचे उत्तर **एक** पानापेक्षा जास्त असू नये : $8 \times 5 = 40$

19. तुमच्या अध्यापनाच्या सरावावर आधारीत, तुम्ही व्यवसायीक शिक्षक बनण्यासाठी अमलात आणलेल्या कोणत्याही पाच गोष्टीचे स्पष्टीकरण करा.

    **किंवा**

    "अभ्यासक्रम आणि पाठ्यक्रम हे एक सारखे नाहीत परंतु ते एकमेकाला पूरक आहेत." सेवा-पूर्व अध्यापन प्रशिक्षणामधील तुमच्या अनुभवावरुन तुम्ही या विधानाचे स्पष्टीकरण कसे कराल ?

20. मुलाच्या सामाजीकरणामध्ये कुटुंब, समवयस्क गट, शाळा, संस्कृती आणि समुदाय यांच्या भूमिकेचे थोडक्यात वर्णन करा.

    **किंवा**

    शैक्षणिक समाजशास्त्राच्या व्याप्तीतील कोणत्याही पाच घटकांचे थोडक्यात वर्णन करा.

21. ''हल्लीच्या काळात मुलांच्या सामाजीकरणामध्ये सपर्क माध्यम हा उत्तम प्रतिनिधी आहे.'' या विधानाचे स्पष्टीकरण करा.

**किंवा**

''अध्ययन ही एक पायाभूत सामाजिक प्रक्रिया आहे.'' याचे स्पष्टीकरण करा.

22. एकाच शिक्षकाने परिणामकारी अध्यापन-अध्ययन पद्धतीने एकापेक्षा जास्त वर्ग चालविले. या घटनेवेळी तिने वापरलेल्या अध्ययन प्रक्रियेतील काणत्याही पाच पद्धतीचे मौल्यमापन करा.

**किंवा**

बहुश्रेणीय वातावरणात, 'समवयस्क अध्यापनाने' अध्ययनाचे सुलभीकरण हे 'शिक्षक केंद्रित अध्ययनापेक्षा अधिक परिणामकारी आहे'. स्पष्टीकरण करा.

23. बाल्यावस्थेच्या शेवटच्या पायरोत आढळणाऱ्या गुणवैशिष्ट्यांचे थोडक्यात वर्णन करा.

**किंवा**

रचनात्मक अध्यापन-अध्ययन प्रक्रियेतील 5-E चे उदाहरणासह थोडक्यात वर्णन करा.

24. जोनसेनच्या मतानुसार, तुमच्या वर्गखोलीतील प्रसंगात अध्यापन-अध्ययन वातावरणाशी रचनात्मक सहभागाला कसे सामावून घ्याल ? याचे स्पष्टीकरण करा.

**किंवा**

'मुलाचा सर्वकश विकास हा शिक्षणाचा मुख्य हेतू आहे.' शिक्षक या नात्याने परिणामकारी भूमिका साकारण्यासाठी तुम्ही वापरलेल्या घटकांचे वर्णन करा.

25. तुमच्या अध्यापनाच्या अनुभवावरुन तुमच्या वर्गातील प्रतिभावंत बालके ओळखण्यासाठी तुमच्या आवडीच्या कोणत्याही पाच दर्शकांचे विवरण करा.

**किंवा**

अनुसचित जाती आणि जमातीच्या मुलांसाठी शिक्षकाने राष्ट्रीय केंद्रीकृत गट स्थान पत्रिकेत शिफारस केलेल्या समस्या लिहा आणि तुमच्या प्रशिक्षण अनुभवाच्या आधारे विश्लेषण करा.

26. श्रीलक्ष्मी ही एक प्रतिभावंत मूलगी आहे. तिच्यासाठी वर्गातील सामान्य अध्ययन प्रक्रिया फारच कंटाळवाणी आहे. तिच्या अध्ययनाचा वेग वाढविण्यासाठी बालक मैत्रीपूर्ण शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी समावेशक पाच कृती रचा.

**किंवा**

विविधता ही एक समस्या न समजता संपन्नमूल म्हणून विचारात घेणे गरजेचे आहे. या दिशेने तुम्ही तुमच्या वर्गखोलीत विविध उगम कसे निर्माण करू शकता ?